# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**दिनांक ११/०६/२०२४ (मंगळवार) सकाळ**

---

## अवैध रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना अटक
## वाहनासह एकुण ३०,६०,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त

दिनांक १०/०६/२०२४ रोजी फिर्यादी हे पोस्टे भिवापूर हद्दीत पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, मौजा नांदा फाटा येथे अवैधरीत्या विनापरवाना रेती (वाळु) लोड करून चोरटी वाहतुक करीत आहे. अशा खात्रीशीर बातमीवरून मौजा नांदा फाटा येथे अवैध रेती संबंधाने अचानक नाकाबंदी केली असता **०२** टिप्पर येतांना दिसले. १० चक्का टिप्पर क्र. एम एच— ४०/एके ६२७२ चा चालक आरोपी नामे— १) विशाल गोकुलदास डडमल, वय १८ वर्ष, रा. नवेगाव देशमुख २) क्लीनर नामे— शंकर गंगाधर जांभुळे वय २१ रा जांभुळघाट ता. चिमुर जि. चंद्रपुर व १० चक्का टिप्पर क्र. एम एच ४० बीजी ९८५८ चा चालक आरोपी नामे— ३) राहुल राजु वाकडे वय २८ रा आंबेनेरी त चिमुर जि. चंद्रपुर ४) क्लीनर नामे— नथ्थु अर्जुन भुजाडे, वय ४३ वर्ष, रा. भुयार ता. पवनी जि. भंडारा क्लीनर ५) प्रणय विजय आठमांडे वय २१ वर्ष, रा भुयार ता. पवनी जि. भंडारा यांना थांबवून चेक केले असता आपापल्या वाहनात अवैदयरीत्या विनापरवाना रेती चोरी वाहतुक करतांना आढळल्याने आरोपींच्या ताब्यातून १० चक्का टिप्पर क्र. एम एच— ४०/एके **6272** किंमती १५०००००/—रू. मध्ये ०६ ब्रास रेती किंमती ३०,०००/—रूपये व १० चक्का टिप्पर क्र. एम एच— ४० बीजी ९८५८ किंमती १५,००,०००/—रू. मध्ये ०६ ब्रास रेती किंमती ३०,०००/—रू. दोन्ही वाहनामधील एकुण १२ ब्रास रेती किंमती ६०,०००/—रू. असा एकुण ३०,६०,०००/— रूपयाचा मुद्देमाल आरोपींच्या ताब्यातून जप्त करून आरोपीतांविरूद्ध कलम ३७९, १०९, ३४ भा. द.वी. सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमिन महसूल संहिता, सहकलम २१, ०४ खाणी आणि खनिजे अधिनियम १९५७ सहकलम ३ सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान प्रतिबंधक अधि. १९८४ अन्वये पो. स्टे. भिवापूर येथे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे भिवापूर येथील ठाणेदार सपोनि जयप्रकाश निर्मल, पोना रविंद्र जाधव, पोशि मनोज चाचेरे, दीपक ढोले, निकेश आरीकर यांनी केली.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर